# फायनान्स अँण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१

**(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)**

| विशाल लोहार | विजय जाधव | प्रितम घोगरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | महासचिव | उपाध्यक्ष |
| ९६६५२०२७३६ | ९३०९८१७९८३ | ९३७०९३१५९२ |

**संदीप तिकटे**
कोषाध्यक्ष
९७६६२०९६७८

**प्रशांत नरड**
प्रसिद्धी प्रमुख
९१४६६८६२२०

**लक्ष्मीकांत पवार**
सहसचिव
९६६५३०५५७७

**विलास लकडे**
सहसचिव
९६३७४१५४४५

**भूषण शिंदे**
संघटक
९११९५९५७६५

**स्नेहल वैष्णव**
महिला प्रतिनिधी
९६३७४१५४४५


जा.क्र.FAEU/मुख्य.का./ 0010 — दिनांक: 17/09/2025

**प्रति,**
**मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई – ४०००३२.**

**विषय : महावितरण कंपनीतील प्रस्तावित पुनर्रचनेबाबत लेखा संवर्गाच्या आक्षेप व सुधारणाबाबत..**

**संदर्भ** :- १.दिनांक 25 मार्च 2025 रोजी पुनर्रचना समिती व मुख्यालय प्रशासन यांना 1314 लेखा कर्मचारी यांचेमार्फत सादर केलेले सुधारणात्मक निवेदन.

२.दिनांक 12 सप्टेंबर 2025 रोजी मुख्यालयामार्फत पुनर्रचनेबाबत आयोजित बैठकीला संघटना म्हणून का आमंत्रित केले नाही याबाबत मा. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना विचारणा पत्र दिनांक 10 सप्टेंबर 2025.

३.दिनांक 12 सप्टेंबर 2025 रोजी मा. मुख्य महाव्यवस्थापक माहिती व तंत्रज्ञान व मा. संचालक(मांस) यांचेकडे मेलद्वारे मागितलेली माहिती.

मा. महोदय,

सविनय कळविण्यात येते की, आपल्या द्वारे पुनर्रचनेबाबत वेळोवेळी जाहीर करण्यात आलेला प्रस्तावित आराखडा व जॉब चार्ट मध्ये दैनंदिन कामकाजाच्या पद्धतींमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आलेले दिसतात. मात्र हे बदल प्रत्यक्ष परिस्थितीशी अजिबात सुसंगत नाहीत. पुनर्रचना मांडताना सर्व कर्मचारी यांच्या कामाचा त्यांच्या मार्फत निर्गमित होणाऱ्या ग्राहक सेवेचा सखोल अभ्यास करून पुनर्रचना आराखडा मांडणे आपल्याकडून अपेक्षित होते परंतु असे झालेले दिसत नाही. लेखा कर्मचारी यांचेवर पुनर्रचना आराखडा जाहीर झाल्यापासूनच पदसंख्येत अन्याय केलेला दिसतो. लेखा कर्मचारी यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्रभरातील लेखा कर्मचारी यांनी स्वयंस्फूर्तीने एकत्र येऊन लेखा अभ्यास गट स्थापन केला. या गटाने एक महिन्याहून अधिक काळ समर्पित अभ्यास करून मुख्यालयास 30 पानी सविस्तर निवेदन सादर केले. त्यात सुधारणा सुचवून त्या गांभीर्याने अवलंबिण्याची विनंती करण्यात आली. हे निवेदन 1314 लेखा बांधवांच्या स्वाक्षरीसह (संपूर्ण संवर्गाच्या सुमारे 25%) दिनांक 25 मार्च 2025 रोजी पुनर्रचना समिती व मुख्यालय व्यवस्थापनास देण्यात आले.

परंतु दुर्दैवाने, या महत्त्वपूर्ण निवेदनावर आजपर्यंत ना मुख्यालय प्रशासनाने अपेक्षित प्रतिसाद दिला, ना अन्य कोणत्याही संघटनांनी सदर सुधारणांना पाठिंबा दिला. त्यामुळेच जुलै 2025 मध्ये महाराष्ट्रातील लेखा कर्मचारी यांनी एकत्र येऊन **फायनान्स अँड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन** या संघटनेची स्थापना केली. या स्थापनेची औपचारिक माहिती 30 सभासदांच्या उपस्थितीत मा.मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना 25 जुलै 2025 रोजी मुख्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी स्वरूपात देण्यात आली. त्या भेटीत आम्ही लेखा अभ्यास गटाने मुख्यालयाला सादर केलेल्या निवेदनावर सविस्तर चर्चा देखील झाली.

मुख्यालयाने पुनर्रचना लागू करण्याच्या दृष्टीने संघटनांसोबत दिनांक 11 सप्टेंबर 2025 रोजी बैठक आयोजित केली. मात्र सदर बैठकीस लेखा अभ्यास गट म्हणून अथवा संघटना म्हणून कोणतेही आमंत्रण आम्हास देण्यात आले नाही. यावरून असे दिसते कि मुख्यालय व्यवस्थापन पुनर्रचनेत लेखा कर्मचारी यांचे प्रतिनिधित्व नाकारून एकतर्फी पुनर्रचना लादण्याचा प्रयत्न करीत आहे. पुनर्रचना हि ग्राहक, कर्मचारी व कंपनी यांच्या हितास दिर्घकालीन प्रभाव टाकणारी अतिशय महत्वपूर्ण प्रक्रिया असून ती वास्तविक तथ्यांचा आधार घेवून केली गेली पाहिजे. दुर्दैवाने प्रशासनाने मांडलेली पुनर्रचना प्रत्यक्ष वास्तवाच्या विपरीत आहे हे खालील मुद्द्यांच्या आधारे लक्षात येईल.

1. पुनर्रचनेत मांडले प्रमाणे प्रति विभाग एक निम्नस्तर लिपिक लेखा (134 पदे) व मंडळ कार्यालयातील 50 टक्के HT बिलिंग सहाय्यक लेखापाल (अंदाजित 41 पदे) ही मंजूर पदे कपात करून तेथील समकक्ष कर्मचारी यांच्या कामाचा बोझा वाढविणे प्रस्तावित का केले आहे ? त्यातून लेखा कर्मचारी यांची बदली व पदोन्नती श्रेणी विस्कटीत होणार आहे.
2. प्रस्तावित पुनर्रचनेत बिलिंग विभागातील कामकाजाचे स्वरूप निश्चित करून बिलिंगच्या कामाची विभागणी करण्याऐवजी, त्या विभागातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती इतर विंग्स मध्ये करून, अप्रत्यक्षपणे इतर कर्मचाऱ्यांवर कामांचा अतिरिक्त भार टाकण्यात आलेला आहे. या निर्णयामुळे लेखा कर्मचाऱ्यांचा कामाचा ताण असह्य पातळीवर पोहोचला असून, **सद्यस्थितीत उपविभागीय लेखा कर्मचारी यांना काम पूर्ण करण्यासाठी रात्री उशिरापर्यंत कार्यालयात थांबावे लागते, तसेच घरून प्रणालीमध्ये काम करणे भाग पडते. इतकेच नव्हे तर सुट्टीच्या दिवशीही त्यांना कर्तव्यावर हजर राहावे लागते. प्रत्यक्षात लेखा कर्मचारी आधीच कामाच्या अतिताणाखाली कार्यरत आहेत** अशा परिस्थितीत पुनर्रचना करताना लेखा विभागातील कामाची विभागणी करून मनुष्यबळ वाढविणे अपेक्षित होते. मात्र त्याच्या अगदी विरुद्ध, प्रस्तावित पुनर्रचनेत उपविभागीय चार (२ LDC व २ UDC) लेखा कर्मचारी यांची नियुक्ती इतर टीममध्ये करून बिलिंग विभागातील तब्बल २५% इतकी मोठी कपात करण्यात आलेली आहे. ही बाब कोणत्याही तर्कसंगततेला धरून नसून, **पुनर्रचनेचा मूळ उद्देश असलेल्या कर्मचारीवर्गाचा ताण कमी करण्याऐवजी तो वाढविणारी ठरते. त्यामुळे सदर प्रस्ताव हा एकतर्फी, अव्यवहार्य व कर्मचाऱ्यांच्या हक्कांना बाधक असा आहे.**
3. प्रतिशहर उपविभागात ४ ते १२ पर्यंत शाखा कार्यालय आहेत. शहरातील ग्राहक ग्रामीण ग्राहकांच्या तुलनेत जास्त वेळेस महावितरण कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवून संपर्क साधत असतात. सदर शाखा कार्यालय रद्द केल्यानंतर व असे २ उपविभाग एकत्र केल्यानंतर जवळपास ८ ते २४ ठिकाणी होणारा रोजचा ग्राहक संवाद हा नवीन B&R उपविभागातील बिलिंग विभाग ह्या एकाच कार्यालयाकडे वळणार आहे. उपविभागीय कार्यालयातील लेखा कर्मचारी यांचा मोठा वेळ प्रत्यक्ष कार्यालयात भेट देणाऱ्या ग्राहकांच्या तक्रारी ऐकणे व त्यांचे निरसन करण्यात जातो. हे काम त्यांच्या जबाबदाऱ्यांचा मूलभूत आणि अविभाज्य भाग आहे. तरीदेखील पुनर्रचनेत या घटकाचा पूर्णतः विचारच केलेला दिसत नाही. **म्हणून प्रश्न उभा राहतो की, ग्राहकांच्या तक्रारींचे निरसन करणे हे कामच नाही असे प्रशासनाला वाटते काय?** याशिवाय, पुनर्रचनेमुळे उपविभागीय व शाखा कार्यालयांची संख्या कमी झाल्यास, प्रत्यक्ष भेट देणाऱ्या ग्राहकांची संख्या दुप्पट होणार आहे. त्यामुळे लेखा कर्मचाऱ्यांचा कामाचा ताण प्रचंड वाढणार असून, ग्राहक सेवेत गोंधळ आणि विलंब निर्माण होणार हे उघड आहे. **कंपनीच्या ध्येय व उदिष्ट मध्ये ग्राहक सेवा हि महावितरणचा केंद्रीकृत घटक असेल हे जाहीर केले आहे. मात्र त्याचाच विचार न करता केलेली ही पुनर्रचना म्हणजे कंपनीच्या ध्येय व उदिष्ट यांचेशी झालेली विसंगती आहे.**
4. सद्यस्थितीत बिलिंग विभागात कार्यरत चार कर्मचारी (LDC-२, UDC-२) यांना नवीन सोपवण्यात येणारी कामे ही सद्यस्थितीत कक्षातील कार्यालयीन सहाय्यक यांच्याकडून पार पाडली जातात पुनर्रचनेत सदर प्रती शाखा कार्यालय एक असे २ उपविभाग मिळून जवळपास ८ ते २४ कार्यालयीन सहाय्यक या पदाच्या कर्मचारी यांना कोणती कामे करायची हे कर्तव्य तक्त्यात मांडले नाही उलटपक्षी बिलिंग मध्ये कौशल्य असणारी चार कर्मचारीच फक्त बिलिंग ग्राहक सेवेतून कपात करायची असे मांडणारी पुनर्रचना कंपनी हिताची कशी? LDC REC-2, UDC STORE-1, UDC NSC-1 अशे चारही पदे बिलिंग मध्येच नियुक्त असू द्यावीत व सदर कामी कार्यलयीन सहाय्यक यांना नियुक्त करण्यात यावे.
5. आजपर्यंत महावितरणमधील अनेक महत्त्वाच्या कामांमध्ये स्थळ परीक्षण अहवाल अधिकृत करणे ही जबाबदारी शाखा प्रमुख असलेल्या अभियंत्यांकडे होती. मात्र पुनर्रचनेनुसार, स्थळ तपासणी अहवाल तयार करण्याची जबाबदारी फक्त तांत्रिक कर्मचारी यांच्यावर टाकण्यात आली आहे आणि अभियंत्यांना या अत्यंत महत्त्वाच्या जबाबदारीतून पूर्णपणे मुक्त करण्यात आले आहे. हा बदल केवळ अव्यवहार्यच नाही, तर कंपनीच्या महसुलालाच थेट धोक्यात आणणारा आहे. कारण स्थळ तपासणीसारख्या महत्वाच्या अहवालांमध्ये अभियंत्यांचा अधिकृत सहभाग व देखरेख नसेल, तर त्यातील अचूकता, जबाबदारी व उत्तरदायित्व यावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण होईल. महसूलसुरक्षेसाठी आवश्यक असलेली अभियंता-स्तरावरील

संदीप तिकटे
कोषाध्यक्ष
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
प्रसिद्धी प्रमुख
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
सहसचिव
९६६५३०५५७७

विलास लकडे
सहसचिव
९६३७४१५४४५

भूषण शिंदे
संघटक
९११९५९५७६५

स्नेहल वैष्णव
महिला प्रतिनिधी
९६३७४१५४४५

पडताळणी पूर्णपणे बाजूला सारणे म्हणजे कंपनीच्या महसुलाला जाणूनबुजून धोक्यात टाकणे होय.

6. मुख्य कार्यालयाद्वारे वेळोवेळी सादर करण्यात आलेल्या पुनर्रचना आराखडा व जॉब चार्ट यांचा अभ्यास केला असता, असे जाणवते की **पुनर्रचना समितीने प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या कार्यालये व कर्मचारी यांच्या कामांचा सखोल अभ्यास केलेला दिसत नाही**. जॉब चार्टमध्ये **नमूद केलेली कामे व कर्मचारी प्रत्यक्षात पार पाडत असलेल्या कामांमध्ये लक्षणीय तफावत आहे**. तसेच, **कित्येक महत्वाच्या कामांचा उल्लेख जॉब चार्टमध्ये करण्यात आलेला नाही**. जसे कि, कार्यालयीन भरणा केंद्र चालविण्यासाठी एक लेखा कर्मचारी पूर्णवेळ व्यस्त असतो सदर कामी विशेष पदाची तरतूद करणे अत्यावश्यक आहे. मात्र त्याबाबत आराखड्यात व कर्तव्य तक्त्यात कोणतीच मांडणी व्यवस्थापना कडून झालेली दिसत नाही. **यास व्यवस्थापनाचे गंभीर दुर्लक्ष म्हणावे कि आपणास भरणा केंद्र बंद करणे अपेक्षित आहेत काय समजावे?**
7. MPR-29 / 2010 प्रमाणे महावितरण मध्ये सद्यस्थितीत बरेच लहान उपविभाग (Small Subdivision) कार्यरत आहेत. MPR-29 मध्ये उल्लेखित स्टाप नॉर्म्स प्रमाणे प्रति लहान उपविभाग १ UDC (A/c) हे पद बिलिंग कामी मंजूर आहे. **मात्र कंपनीतील बदललेल्या कार्यपद्धतीप्रमाणे बिलिंग विभागात एकाच वेळी अनेक कामे होणे अपेक्षित असते मात्र एकच कर्मचारी नियुक्त असल्यामुळे सदर कर्मचाऱ्यावर एकाच वेळी अनेक कामे करण्याचा दबाव टाकला जातो.** सदर ठिकाणी मंजूर पदे वाढवणे अपेक्षित असताना पुनर्रचनेत याबाबत कोणतीच तरतूद का करण्यात आली नाही.?

पुनर्रचना प्रस्ताव लागू करण्याआधी वरील मुद्यांवर पुनर्रचनेत मांडणी व्हावी. आजवर व्यवस्थापनाने पुनर्रचनेबाबत अतिशय अत्यल्प माहिती कमर्चारी व संघटनांना जाहीर केलेली आहे. खालील माहिती लवकर जाहीर करावी.

**A. सद्यस्थितीत कार्यरत मनुष्यबळ व त्यांचा कार्यभार अभ्यासणे साठी पुढील माहिती संघटनेस जाहीर करावी.**

1. प्रत्येक कार्यालय व संवर्ग निहाय मंजूर पदे, प्रत्यक्ष कार्यरत पदे व रिक्त पदे यांची यादी जाहीर करावी. सदर माहिती बाबत दिनांक १२/०९/२०२५ रोजी मेल द्वारे मा. संचालक मांस यांचे कडे मागणी केलेली आहे ती Excel format मध्ये लवकर पुरवण्यात यावी.
2. लेखा कर्मचारी यांचा असणारा कार्यभार अभ्यासण्यासाठी मा. मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) यांचेकडे प्रणाली मध्ये बिलिंग बाबत दिले जाणारे सर्व इनपुट वेळेसह (User Wise Timestamp data of database) Excel format मध्ये माहिती दिनांक 12/09/2025 रोजी मा. मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) यांच्याकडे मागितली आहे. मात्र सदर माहिती अद्याप पर्यंत प्राप्त झालेली नाही.
3. किती उपविभाग येथे कार्यालयीन भरणा केंद्र कार्यान्वित आहेत त्यांची यादी व सदर ठिकाणी प्रतिमाह किती रक्कमेचा भरणा होतो ते ग्राहक संख्येसह देण्यात यावे?

**B. पुनर्रचना कशी सकारात्मक आहे. सदर पुनर्रचना मांडणी कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कामाचा तान कमी करणारी, ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवेचा स्तर उंचावणारी व त्यातून कंपनीचे दिर्घकालीन हित साधणारी आहे याबाबत कर्मचारी व संघटना यांना खालील माहिती जाहीर करावी.**

1. लेखा संवर्ग कर्मचारी यांचे बदली धोरण कसे असेल याबाबत विस्तृत माहिती जाहीर करावी.
2. लेखा संवर्ग कर्मचारी यांचे पदोन्नती श्रेणीत कोणताच विपरीत हस्तक्षेप पुनर्रचनेतून केले जाणार याबाबत लेखी आश्वासन जाहीर करावे.
3. सद्यस्थितीत कार्यरत संरचना - पुनर्रचनेनंतर होणारा बदल - **होणाऱ्या बदलातून कर्मचारी, ग्राहक व कंपनी यांचे कोणते हित साध्य होणार** असा एक स्वतंत्र आणि सखोल **Impact Assessment Report** (सेवा, महसूल, मनुष्यबळ व ग्राहक परिणाम) तयार करून सार्वजनिक करावा, तसेच त्यानुसार योग्य सुधारणात्मक योजना व वेळापत्रक जाहीर करूनच पुढील

**संदीप तिकटे**
*कोषाध्यक्ष*
९७६६२०९६७८

**प्रशांत नरड**
*प्रसिद्धी प्रमुख*
९१४६६८६२२०

**लक्ष्मीकांत पवार**
*सहसचिव*
९६६५३०५५७७

**विलास लकडे**
*सहसचिव*
९६३७४१५४४५

**भूषण शिंदे**
*संघटक*
९११९५९५७६५

**स्नेहल वैष्णव**
*महिला प्रतिनिधी*
९६३७४१५४४५


पावले उचलावीत. सदर माहितीतून पुनर्रचनेबाबत वास्तविक परिणामांचे अवलोकन करता येईल म्हणून सदर माहिती लवकर जाहीर करावी.

**पुनर्रचना समितीने प्रत्यक्ष बदल होणाऱ्या कोणत्याच कार्यालयामध्ये भेट न देता तेथील वास्तविक परिस्थिती समजून न घेता फक्त मुख्यालयात बसून अवास्तविक तथ्यांच्या आधारे सदर पुनर्रचना मांडणी केली आहे. असे संघटनेचे ठाम मत आहे. पुनर्रचना वास्तविक तथ्यांच्या आधारे मांडली जावी पुनर्रचनेतून कर्मचारी,ग्राहक व कंपनी यांचे हीत साधले जावे.** यासाठी लेखा अभ्यास गट व संघटना मिळून मुख्यालय व्यवस्थापन व पुनर्रचना समिती यांच्याकडे संदर्भ क्रमांक १ ते ३ प्रमाणे अभ्यासपूर्ण पत्रव्यवहार करून सुधारणा सुचविण्याचा व संपर्क साधण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला आहे.

मुख्यालय व्यवस्थापनाने कोणत्याच पत्राचा किंवा ई-मेलचा प्रतिसाद लेखी पत्र देऊन किंवा ईमेल द्वारे दिलेला नाही. व पुनर्रचना बैठकीत आमंत्रितही केले नाही यातून मुख्यालय प्रशासनाचे धोरण संपूर्ण लेखा संवर्ग यांचे बाबत अतिशय उदासीन असल्याचे खात्री संपूर्ण लेखा संवर्ग कर्मचारी यांची होत आहे. त्यामुळे मुख्यालय प्रशासनाने संघटने सोबत लवकर बैठक आयोजित करावी व विस्तृत चर्चा घडवून आणावी. अन्यथा अतिशय अवास्तविक तथ्यांचा आधार घेऊन मांडलेली पुनर्रचना लेखा व इतर कर्मचारी यांच्या कामांमध्ये असमतोल निर्माण करणारी, ग्राहक सेवेचा स्तर खालवणारी व पर्यायाने कंपनीचे दीर्घकालीन आर्थिक स्वास्थ्य खराब करणारी आहे. लेखा कर्मचारी यांच्या हिताचे हनन करणाऱ्या सदर पुनर्रचना प्रास्तव लागू करण्यास संघटनेचा ठाम विरोध आहे. संघटना सर्व पातळीवर आपल्या सभासदांचे हित, अधिकारांचे रक्षण करण्यास कटिबद्ध आहे. तरी मुख्यालय प्रशासनाने या विषयावर संघटनेसोबत सविस्तर चर्चा आयोजित करून व्यवहार्य व सर्वसमावेशक उपाययोजना कराव्यात, ही विनंती.

| अध्यक्ष | महासचिव |
|---|---|
| **विशाल लोहार** | **विजय जाधव** |

**माहिती व योग्य कार्यवाही साठी सविनय सादर :-**

१) मा. संचालक (संचलन/मासं / वाणिज्य /प्रकल्प/लेखा) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
२) मा. परेश भागवत कार्यकारी संचालक (मासं), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
३) मा. दत्तात्रय पडळकर (कार्यकारी संचालक वितरण-२), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
४) मा. मुख्यऔद्योगिक संबंध अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.

# Request for Data Regarding Restructuring Impact on Sanctioned Posts and Working Employees

**From** <official@faeu.in>
**To** <directorhr@mahadiscom.in>
**Date** 2025-09-12 10:50

**Respected Sir/Madam,**

With due respect, this is to kindly request your support in providing comprehensive data to facilitate a detailed study on the impact of the ongoing *Restructuring Process* on sanctioned posts and working employees across the organization.

As you are aware, restructuring is a crucial exercise aimed at improving efficiency, consumer service, and overall organizational performance. We firmly believe that constructive participation, backed by factual analysis, will help achieve these objectives in a balanced and sustainable manner.

For the purpose of conducting this study, we kindly request the following information for **each office in Excel format to quick analyze and summarize data.** (as applicable):

1. 1. Number of sanctioned posts of all staff.
   2. Number of employees currently in working position.
   3. Number of vacant posts.

This data will enable us to:

- Assess workload variations,
- Identify functional gaps created due to restructuring, and
- Provide constructive, data-backed suggestions for fair staffing norms and smooth implementation.

We wish to emphasize that our approach is positive and cooperative. Our intention is to ensure **fair participation of employees in restructuring**, so that contributions are recognized, workloads are rationalized, and the company benefits from efficient and harmonious operations.

We request you to kindly share the above information at the earliest, preferably in a compiled format, so that a comprehensive study may be completed within the stipulated timeline.

Your cooperation in this matter will be highly appreciated.

Regards,
Vijay Jadhav
General Secretary, FAEU
9309817983 | Official@faeu.in

# Request for Data required for study regarding Restructuring Impact on Billing Employees.

**From** <official@faeu.in>
**To** Cgmit <cgmit@mahadiscom.in>
**Date** 2025-09-12 09:58

**Respected Sir**

With due respect, this is to kindly request your support in providing relevant data to facilitate a detailed study on the impact of the ongoing *Restructuring Process* on **Billing Employees**.

As you are aware, restructuring is a crucial exercise aimed at improving efficiency, consumer service, and overall organizational performance. We firmly believe that constructive participation of all cadres, with factual data and fair analysis, will help achieve these objectives in a balanced manner.

In order to carry out such an objective study, the following information is required.

1. WEB CONSOL login times and logout times doing activity related to billing inputs describe as under From 1 July 2025 to 11 sept 2025.

- PHOTO VERIFICATION.
- READING VALIDATION.
- FAULTY TO NORMAL.
- PREVIOUS READING CORRECTION.
- B80 request submission etc. (all wrok related to billing inlputs.)

2. CRMS portal all activity.

3. EMPLOYEE MITRA APP BILLING INPUT RELATED ACTIVITY

4. BILL REVISION portal all activity.

provide above information as subdivision wise Excel format.

This data will enable us to:

- Assess workload variations,
- Identify functional gaps created due to restructuring, and
- Suggest balanced staffing norms for sustainable operations.

We request you to kindly share the above information at the earliest, preferably in a compiled format, so that a comprehensive study may be completed within the stipulated timeline.

Your cooperation in this matter will be highly appreciated.

Regards,
Vijay Jadhav
General Secretary, FAEU
📞 9309817983 | 📧 Official@faeu.in